|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University Jalgaon

## संलग्नता विभाग

जा.क्र.कबचौउमवि/५/ संलग्नीत महा.प्रस्ताव-२०२७-२८/२४७/२०२६ दि. १६/०९/२०२६

**अत्यंत महत्वाचे**

**परिपत्रक**

**प्रति,**

**कबचौउमविशी संलग्नीत सर्व कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये**

**व समाजकार्य महाविद्यालयांचे मा. प्राचार्य यांना........**

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२७-२८ पासून सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या पारंपारिक महाविद्यालयांमध्ये ' समाजकार्य ' अशी स्वतंत्र विद्याशाखा/नवीन अभ्यासक्रम/अतिरीक्त तुकडी तसेच अस्तित्वात असलेल्या समाजकार्य महाविद्यालयांमध्ये नवीन अभ्यासक्रम/अतिरीक्त तुकडी सुरु करण्यास कायम विनाअनुदान तत्वावर मान्यता देणेबाबत..**

**संदर्भ :-** ०१) शासन निर्णय क्र. मान्यता-२०२६/ई-७९९६८८/मशि-४ दि. २७ ऑगस्ट, २०२६

०२) विद्यापीठाचे परिपत्रक जा.क्र.कबचौउमवि/५/ संलग्नीत महा.प्रस्ताव-२०२७-२८/२३५/२०२६ दि. ८/०९/२०२६

०३) शासनाचे पत्र जा.क्र. मान्यता-२०२६/ई-७९९६८८/मशि-४ दि. १५/०९/२०२६

**महोदय/महोदया,**

उपरोक्त संदर्भिय शासन निर्णय क्र. १ तसेच विद्यापीठाचे परिपत्रक संदर्भिय क्र. २ अन्वये कळविण्यात आले होते की, शैक्षणिक वर्ष २०२७-२८ पासून सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या पारंपारिक महाविद्यालयांमध्ये समाजकार्य अशी स्वतंत्र विद्याशाखा/नवीन अभ्यासक्रम/अतिरीक्त तुकडी तसेच अस्तित्वात असलेल्या समाजकार्य महाविद्यालयांमध्ये नवीन अभ्यासक्रम/अतिरीक्त तुकडी कायम विनाअनुदान तत्वावर सुरु करण्यासाठी शासनाने मंजूरी दिलेली होती.

परंतु शासनाचे संदर्भिय पत्र क्र. ३ अन्वये विद्यापीठास कळविण्यात आलेले आहे की, समाजकार्य अभ्यासक्रमाची अनियंत्रित वाढ होऊ नये याकरीता शैक्षणिक वर्ष २०२७-२८ साठी समाजकार्य अभ्यासक्रमासाठी वार्षिक योजना तयार करणेबाबतचे निकष निश्चित करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे. तरी पुढील निर्देश प्राप्त होईपर्यत समाजकार्य अभ्यासक्रम/अतिरीक्त तुकडी बाबत कोणतीही कार्यवाही करण्यात येऊ नये. तरी उपरोक्त प्रमाणे नोंद घेवून समाजकार्य अभ्यासक्रम/अतिरीक्त तुकडी याबाबतचे प्रस्ताव पुढील आदेश होईपर्यत सादर करण्यात येवू नये, याची कृपया नोंद घ्यावी ही विनंती.

**सोबत :-** संदर्भ क्र. ३ चे शासनाचे पत्र.

**आपला विश्वासू,**

**(डॉ. विनोद मा.पाटील)**

**कुलसचिव**

**प्रत माहितीसाठी :-**

मा.प्र-कुलगुरु महोदय, कबचौउमवि, जळगाव

मंत्रालयीन सेवा
महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार, कक्ष क्रमांक **418**, चौथा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-**32.**

**Email ID:mashi4-hted@mah.gov.in -**

क्रमांक : मान्यता-**2026/ई-799688/**मशि-**4** दिनांकः स्वाक्षरीप्रमाणे

प्रति,

कुलसचिव,
सर्व राज्य सार्वजनिक विद्यापीठे,
महाराष्ट्र राज्य.

**विषयः** शैक्षणिक वर्ष 2027-28 पासून सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या पारंपारिक महाविद्यालयांमध्ये समाजकार्य अशी स्वतंत्र विद्याशाखा/ नवीन अभ्यासक्रम/ अतिरिक्त तुकडी तसेच अस्तित्वात असलेल्या समाजकार्य महाविद्यालयांमध्ये नवीन अभ्यासक्रम/ अतिरिक्त तुकडी सुरू करण्यास कायम विनाअनुदानित तत्वावर मान्यता देणेबाबत.

**संदर्भः** शासन निर्णय क्र. मान्यता-2026/ई-799688/मशि-4, दिनांक 27.08.2026 .

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, सन 2027-28 या शैक्षणिक वर्षापासून सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या पारंपारिक महाविद्यालयांमध्ये महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, 2016 मध्ये नमूद कार्यपद्धतीनुसार 'समाजकार्य' अशी स्वतंत्र विद्याशाखा/ नवीन अभ्यासक्रम/ अतिरिक्त तुकडी तसेच, अस्तित्वात असलेल्या समाजकार्य महाविद्यालयांमध्ये नवीन अभ्यासक्रम/ अतिरिक्त तुकडी कायम विनाअनुदानित तत्वावर सुरू करण्यासंदर्भात शासन निर्णय दि.27.08.2026 अन्वये धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला आहे.

तथापि, वारीलप्रमाणे मान्यता देताना समाजकार्य अभ्यासक्रमाची अनियंत्रित वाढ (Mushroom Growth) होऊ नये याकरिता शैक्षणिक वर्ष 2027-28 साठी समाजकार्य अभ्यासक्रमासाठी वार्षिक योजना तयार करणेबाबतचे निकष निश्चित करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरू आहे. सबब, शासनाकडून पुढील निर्देश प्राप्त होईपर्यंत समाजकार्य अभ्यासक्रम/ अतिरिक्त तुकडी यांना मान्यता देणेअनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येऊ नये. || Important

Digitally signed by
Jayshree Jaideep Pawar
Date: 15-09-2026
11:15:15

(जयश्री पवार)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन